# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-ल

वर्ष १, अंक ६८(६)] बुधवार, डिसेंबर १६, २००९/अग्रहायण २५, शके १९३१ [पृष्ठे ८

किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक २४५

## प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ डिसेंबर २००९

## अधिसूचना

**किमान वेतन अधिनियम, १९४८.**

क्रमांक किवेअ. ९२००९/प्र.क्र. १२१३/कामगार-७.–किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) (यात यानंतर ज्याचा उक्त अधिनियम असा निर्देश करण्यात आलेला आहे.) हा महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात आल्यानंतर त्याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) चा खंड (ब) अन्वये महाराष्ट्र राज्यातील " घड्याळाच्या चौकटी बनविण्याचा कामधंदा " अशा कोणत्याही उद्योगातील रोजगारात कामावर असलेल्या कामगारांना देय असलेले किमान वेतन दर निर्धारित करण्याबाबतचा प्रस्ताव अंतर्भूत असलेली जी अधिसूचना काढण्याचे प्रस्तावित केलेले आहे. त्या अधिसूचनेचा पुढील मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे त्यामुळे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे. आणि त्याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** सदरहू अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांनंतर महाराष्ट्र शासन उक्त मसुदा विचारात घेईल.

उक्त मसुद्याच्या संबंधात उपरोक्त कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीकडून जे कोणतेही अभिवेदन कामगार आयुक्त, कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई ४०० ०३४ यांचेकडून येईल ते शासनाकडून विचारात घेण्यात येईल.

## अधिसूचनेचा मसुदा

क्रमांक किवेअ. १२००९/प्र.क्र. १२१३/कामगार-७.–ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील " चष्म्याच्या चौकटी बनविण्याचा कामधंदा " अशा कोणत्याही उद्योगातील रोजगारात (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अनुसूचित रोजगार असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) कामावर असलेल्या कामगारांना देय असलेले किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग किवेअ. २२००३/सीआर-१२२/कामगार-७, दिनांक २१ जुलै २००४ अन्वये पुनर्निर्धारित केले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने पुनर्विलोकन करून उक्त अनुसूचित रोजगारातील कामगारांना देय असलेले किमान वेतन दर पुनर्निर्धारित करण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी, आता किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) हा महाराष्ट्र राज्यात लागू करताना त्याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) आणि कलम ५ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक किवेअ. १२००९/प्र.क्र. १२१३/कामगार-७, दिनांक १६ डिसेंबर २००९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रस्तावाच्या संबंधात मिळालेली सर्व अभिवेदने विचारात घेतल्यानंतर महाराष्ट्र शासनाने यापुढे दिनांक . . . . . . पासून उक्त अनुसूचीत रोजगारांत नोकरीत असलेल्या यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या कामगारांच्या वर्गाला त्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतनाचे किमान वेतन दर पुनर्निर्धारित करीत आहे.

## अनुसूची

| अ. क्र. (१) | कामगारांची वर्गवारी (२) | मूळ किमान वेतन दरमहा (रुपये) (३) | | |
|---|---|---|---|---|
| | | परिमंडळ-१ | परिमंडळ-२ | परिमंडळ-३ |
| १. | कुशल | ४,७५० | ४,६०० | ४,४५० |
| २. | अर्धकुशल | ४,६०० | ४,४५० | ४,३०० |
| ३. | अकुशल | ४,४५० | ४,३०० | ४,१५० |

**स्पष्टीकरण** :– या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ,

(ए) **परिमंडळ-१.**–महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व क्षेत्राचे मिळून होईल.

(बी) **परिमंडळ-२.**–महाराष्ट्र राज्यातील ' अ ' व ' ब ' वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील सर्व क्षेत्राचे समावेश होईल.

(सी) **परिमंडळ-३.**–परिमंडळ-१ व परिमंडळ-२ वगळून राज्यातील इतर सर्व क्षेत्रांचा समावेश होईल.

(डी) रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांस देय असलेले मजुरीचे किमान वेतन दर तो कामगार ज्या वर्गाचा असेल त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजुरीच्या दरांना २६ ने भागून येणारा भागाकार नजिकच्या पैशापर्यंत पूर्णांकात करून काढण्यात येईल.

(इ) किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल.

(एफ) किमान वेतन दरामध्ये मूळ दर, विशेष भत्ता आणि सवलती असल्यास, त्यांचे रोख मूल्य यासाठी अनुज्ञेय असलेल्या सर्व दरांचा समावेश असेल.

(जी) एखादा कुशल कामगार म्हणजे जो स्वतःच्या निर्णय शक्तीनुसार आपले काम कार्यक्षमतेने व जबाबदारीने पार पाडू शकतो असा कामगार.

(एच) अर्धकुशल कामगार म्हणजे सर्वसाधारणपणे नित्याच्या स्वरूपाचे काम करतो की, ज्यामध्ये निर्णय घेण्याची फारशी गरज नसते. परंतु तुलनेने त्याला दिलेले छोटेसे काम की, ज्यामध्ये महत्त्वाचे निर्णय इतरांकडून घेतले जातात असे काम योग्य रीतीने पार पाडण्याची आवश्यकता असते. मर्यादित व्याप्तीचे नित्याचे काम पार पाडणे हेच त्याचे कर्तव्य असते.

(आय) अकुशल कामगार म्हणजे ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र निर्णय घेणे आणि पूर्वानुभव असणे आवश्यक नाही. परंतु तरीही व्यावसायिक परिस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे. असे साध्या कर्तव्य पालनाचा अंतर्भाव असलेले काम करणारा कामगार म्हणून त्याच्या कामासाठी शारीरिक परिश्रमाशिवाय निरनिराळ्या वस्तुंची किंवा मालाची त्याला चांगली माहिती असणे आवश्यक असेल.

## परिशिष्ट

महाराष्ट्र राज्यातील ५० केंद्रांचा सरासरी ग्राहक मूल्य निर्देशांक (नवीन मालिका १९८२=१००) हा उक्त अनुसूचीत रोजगारात नोकरीत असलेल्या कामगारांना लागू असलेला व राहणीमान निर्देशांक असेल. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी, १ जानेवारी आणि १ जुलै रोजी सुरू होणाऱ्या प्रत्येक सहामाहीच्या समाप्तीनंतर, त्या सहा महिन्यांसाठी उक्त कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या राहणीमान निर्देशांकाची सरासरी काढील आणि ७३४ निर्देशांकावर अशा प्रत्येक अंकाच्या वाढीसाठी ज्या सहामाहीच्या संबंधात अशी सरासरी काढण्यात आलेली असेल, त्या सहा महिन्यालगत पुढील सहामाहीसाठी उक्त कर्मचाऱ्यांना देय असलेला विशेष भत्ता (यात यानंतर ज्याचा " राहणीमान भत्ता " असा निर्देश करण्यात आलेला आहे.) परिमंडळ-१ करिता दरमहा रुपये ५.४० या दराने असेल.

२. सक्षम प्राधिकारी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उपरोक्त प्रमाणे हिशेब करून काढलेला राहणीमान भत्ता जेव्हा जानेवारी ते जून या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल तेव्हा जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये आणि जेव्हा जुलै ते डिसेंबर या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये जाहीर करील :

परंतु, सक्षम प्राधिकारी, किमान वेतन निश्चित केल्याच्या दिनांकापासून देय असलेला राहणीमान भत्ता, जून किंवा डिसेंबर अखेरपर्यंत किंवा यथास्थिती, किमान वेतन दर निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकानंतर लगेचच जाहीर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सदाशिव कांबळे,**

शासनाचे उप सचिव.